# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 10 मार्च 2021, दि. 05 एप्रिल 2021, दि. 06 एप्रिल 2021 व दि. 07 एप्रिल 2021.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 13 एप्रिल 2021.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 14 एप्रिल 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 16/04/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूच्या संसर्गाची साखळी तोडण्याच्या अनुषंगाने दि. 14 एप्रिल 2021 रोजी रात्री 08.00 वाजेपासून दि. 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचनांनुसार या कार्यालयाने संदर्भ क्र. 6 अन्वये आदेश पारित केला आहे. या आदेशाच्या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यात फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 144 नुसार संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. या कालावधीत संदर्भ क्र. 6 च्या आदेशातील मुद्दा क्र. 1 (d) नुसार अत्यावश्यक सेवांकरिता संचारबंदीतून सूट देण्यात आली आहे व मुद्दा क्र. 1 (e) नुसार सूट देण्यात आलेल्या बाबींकरिता सकाळी 7 ते रात्री 8 या वेळेत होणारी हालचाल वगळता कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक ठिकाणी संचार करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांनी केवळ अत्यावश्यक कारण असेल तरच बाहेर पडणे अपेक्षित आहे. तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, संदर्भ क्र. 6 च्या आदेशानुसार जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली असली तरी नागरिक अत्यावश्यक सेवांबरोबरच सूट देण्यात आलेल्या बाबींचे कारण नमूद करून मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असून संचारबंदीचे उल्लंघन करित असल्याचे दिसून येत आहे.

सद्यस्थितीत उस्मानाबाद जिल्ह्यात कोविड-19 च्या रुग्णसंख्येत दररोज सातत्याने वाढ होत असून वरिल परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे नागरिकांकडून विनाकारण संचारबंदीचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत



Scanned by CamScanner

असल्यामुळे कोव्हिड 19 या विषाणूच्या संसर्गाची साखळी तोडण्यासाठी तात्काळ अधिकच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व आणखी कडक निर्बंध लागू करणे अत्यावश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदींनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात दि. 16 एप्रिल 2021 ते दि. 30 एप्रिल 2021 या कालावधीत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आदेशित करीत आहे.**

1. **संदर्भ क्र. 6 च्या आदेशातील मुद्दा क्र. 2 मध्ये नमूद करण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवांपैकी (Essential Services) फक्त खालील नमूद अत्यावश्यक सेवा (Essential Services) पूर्ण वेळ सुरु राहतील.**

   a) दवाखाने, रोगनिदान केंद्रे, चिकित्सालये, लसीकरण केंद्रे, वैद्यकीय विमा कार्यालये, औषधालये, औषध कंपन्या, चष्मा दुकाने, इतर वैद्यकीय व आरोग्य सेवा आणि त्यांची उत्पादन व वितरणासाठी सहाय्यक सर्व घटक जसे कार्यालये, वाहतूक, पुरवठा साखळी. लसींचे उत्पादन व वितरण, सॅनिटायझर्स, मास्क्स, वैद्यकीय साधनसामुग्री, त्यांची उपकरणे, कच्च्या मालाचे व सहाय्यक सुविधांचे घटक

   b) सार्वजनिक वाहतूक : विमाने, रेल्वे, टॅक्सी, ॲटोरिक्षा व सार्वजनिक बसेस.

   c) मालवाहतूक

   d) पाणीपुरवठा सेवा (या सेवेसाठी काम करणा-या कर्मचा-यांनी ओळखपत्र बाळगणे बंधनकारक)

   e) पेट्रोल पंप

      i. उस्मानाबाद शहरातील पोलीस वेलफेअर पेट्रोल पंप व जिल्ह्यातील सर्व न.प./न.पा./न.पं. यांची हद्द जेथे संपते तेथून पुढे 10 कि.मी. अंतराच्या पुढील भागात असणारे व केवळ राष्ट्रीय महामार्ग/राज्य महामार्गावर असणारे पेट्रोल पंप पूर्ण वेळ सुरु राहतील.

      ii. जिल्ह्यातील सर्व न.प/न.पा./न.पं. हद्दीच्या क्षेत्रात व हद्दीबाहेर 10 कि.मी. अंतराचे आतील भागात असणारे सर्व पेट्रोल पंप सकाळी 7 ते दुपारी 2 या वेळेतच चालू राहतील.

   f) ATM's

   g) विद्युत व गॅस सिलेंडर पुरवठा (या सेवेसाठी काम करणा-या कर्मचा-यांनी ओळखपत्र बाळगणे बंधनकारक)

2. **संदर्भ क्र. 6 च्या आदेशातील मुद्दा क्र. 5 मध्ये नमूद सूट देण्यात आलेल्या बाबीं** (Exemption Category) पैकी फक्त खालील नमूद बाबी पूर्ण वेळ सुरु राहतील.

   a) खाजगी बसेस सह खाजगी वाहनांना फक्त वरिल मुद्दा क्र. 1 (a) मध्ये नमूद अत्यावश्यक सेवांकरिता वाहतूक करण्याची पूर्ण वेळ परवानगी राहील.

3. वरिल मुद्दा क्र. 1 व मुद्दा क्र. 2 मध्ये नमूद केलेल्या अत्यावश्यक सेवा व सूट देण्यात आलेल्या बाबी वगळता संदर्भ क्र. 6 च्या मूळ आदेशातील नमूद **उर्वरित सर्व अत्यावश्यक सेवा आणि सूट देण्यात आलेल्या बाबी सकाळी 7 ते दुपारी 2 या वेळेत चालू राहतील.**



Scanned by CamScanner

4. संदर्भ क्र. 6 च्या मूळ आदेशानुसार बंद असलेल्या सर्व आस्थापना, सार्वजनिक ठिकाणे, बाबी/उपक्रम, सेवा पूर्णवेळ बंद राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आज दिनांक 16/04/2021 पासून तात्काळ लागू करण्यात येत असून सदर आदेश दिनांक 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील. तसेच या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी (Incident Commander, पोलीस, न.प./न.पा./न.पं./ग्रा.पं.) यांचेवर राहील. अंमलबजावणी करणा-या यंत्रणांनी कोणत्याही परिस्थितीत नागरिकांकडून संचारबंदीचे उल्लंघन होऊ नये याअनुषंगाने या आदेशाची व या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद.
14. उपअभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, उस्मानाबाद.
15. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर.
17. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
18. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
19. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner